# निष्कर्ष

वि.आ. तथा तात्यासाहेब कोरे ग्रामीण नेतृत्वाचा अभ्यास हा शोध प्रबंध लिहित असताना, तात्यासाहेब कोरे यांनी ग्रामीण विकासाचे नेतृत्व केले, त्याला महाराष्ट्रात तोड नाही. असे संशोधनाअंती दिसून आले. तात्यांची घरची आर्थिक स्थिती सर्वसामान्याच्या पेक्षा चांगली होती, कारण घरी व्यापार, सावकारी, शेती यांचे उत्पन्न चांगले होते. त्यामुळे त्यांना गरीबीची झळ फारशी जाणवली नाही. परंतु कष्ट हे जीवनात महत्वाचे आहे, हे त्यांना लहान वयातच समजले. १९३५ ते १९५२ या काळात आपल्या कुटुंबाचा व्यापार, सावकार व शेती पाहत कोडोलीच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकारणात भाग घेतला व आपणही समाजासाठी काहीतरी भरीव कार्य करावे असे त्यांना वाटू लागले. म्हणूनच १९५२ सालापासून वारणा परिसरातील ग्रामीण जनतेचे जीवनमान सुधारण्यासाठी आहोरात्र कष्ट केले. त्याचेच आज वारणानगर हे साक्षात रूप आहे.

तात्यांच्या विचारावर म.गांधीजींचा प्रभाव होता. १९४२ च्या स्वातंत्र्य लढयात गांधीजीनी 'खेडयाकडे चला'असा संदेश संपूर्ण देशबांधवाना दिला. त्याचा परिणामही तात्यांच्यावर झाला. देश सुधारण्यासाठी प्रथम खेडी सुधारली पाहिजेत हे तात्यांनाही पटले होते. त्यातूनच त्यांनी श्री वारणा सहकारी साखर कारखाना, वारणा विभाग शिक्षण मंडळ, वारणा सहकारी बँक, वारणा कोंबडी संघ, वारणा दूध संघ, वारणा बझार, वारणा विभाग सत्कार्य संवर्धक मंडळ, महात्मा गांधी मेडिकल ट्रस्ट, महिला संस्था इत्यादी उद्योग वारणेमध्ये करून ग्रामीण विकासाचे नेतृत्व केले. त्यांच्या या ग्रामीण विकासाच्या कार्यामध्ये निवृत्ती विठोजी घोरपडे तथा घोरपडेआण्णा, श्री.स.आ. तथा बापूसाहेब गुळवणी, श्री.गणेश बापूजी जोशी, दिनकर तथा नानासाहेब कोरे,

बाजीराव बाळाजी पाटील, नंदकुमार नाईक इ.सहकारी मित्रांनी तात्यांना बहुमूल्य सहकार्य केले म्हणूनच तात्यांनी स्थापन केलेला प्रत्येक उद्योग यशस्वी झाला.

महाराष्ट्रात सहकार क्षेत्रात भरीव कार्य केलेल्या बहुतेक सर्व व्यक्तींनी राजकारणात भाग घेऊन अनेक मानाची पदे भुषवली. पण तात्यासाहेब हे याला अपवाद आहेत. त्यांनी सहकारात मोठे काम करून सुध्दा सार्वत्रिक राजकारणात प्रत्यक्ष कधीही भाग घेतला नाही. त्यांनी सहकार क्षेत्राच्या माध्यमातून ग्रामीण विकास करण्याचे आणि तळागाळातील माणूस सुखी करण्याचे स्वप्न पाहिले होते. भारताच्या नकाशावर एक तरी प्रदेश असा असेल की जेथे गरीबी पूर्णपणे नसेल या जिद्दीने वारणा खोऱ्याचे नंदनवन करण्यासाठी ते कार्यरत राहिले. सहकाराच्या माध्यमातून विविध संस्था जाळे विणून दाखविले आणि सामान्य माणसाला जीवनाधार पुरविला. त्यांनी राजकारणात भाग घेतला असता तर आज वारणा खोऱ्याचा विकास झाला आहे, तो विकास झाला नसता. तात्यांनी सहकार क्षेत्रात भरीव कार्य करून सुध्दा वारणा सहकारी साखर कारखान्याच्या निवडणूकीत त्यांना मोठा विरोध होत असे, निवडणूकीमध्ये जातीवाद मोठया प्रमाणात झालेला दिसून येतो. तात्यासाहेब हे स्वतः लिंगायत (वाणी) समाजाचे असल्यामुळे लिंगायत लोकांनाच प्राधान्य देतात असा विरोधकांचा आरोप होता. तात्यांचे कार्य मान्य करून सुध्दा, सभासदांनी त्यांना विरोध केला होता, असे आढळून येते. अर्थात विरोधकांना कधीही सत्ता प्राप्त करता आली नाही. या सर्वांचा विचार करून तात्यांनी राजकारणापेक्षा सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण विकास करण्याचे स्वप्न सातत्यात उतरले.

वारणा सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील गावांचा तात्यांच्या नेतृत्वामुळे सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास झाला आहे. तात्यांच्या सारखे ग्रामीण नेतृत्व देशात अनेक ठिकाणी निर्माण होणे गरजेचे

आहे आणि असे नेतृत्व निर्माण झाले तर गांधीजींना अभिप्रेत असणारा देश निर्माण होईल.

तात्यांच्या पश्चात वारणा विविध उद्योग व शिक्षण समूहाचे नेतृत्व मा.आमदार विनय कोरे (सावकर) करत आहेत. त्यांनी सार्वत्रिक राजकारणात भाग घेतला आहे. पण सहकार आणि त्यातून ग्रामीण विकासाच्या बाबतीत विनय कोरे यांची वाटचाल तात्यांच्या विचारानेच चालू असल्याचे दिसून येते. या शिवाय विलास कोरे (दादा) यांचा विज्ञान, तंत्रज्ञानाचा वारसा पुढे चालविण्याचे कामही विनय कोरे करत आहेत.